# राज्यसेवा पूर्वपरीक्षा २०१३

## सुधारित अभ्यासक्रम

२८ सप्टेंबर २०१२ रोजी एमपीएससी आयोगाने राज्यसेवा पूर्वपरीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम बदलल्याचे त्यांच्या वेबसाइटवर जाहीर केले. त्यानुसार ही नवी परीक्षा पद्धती युपीएससीच्या नागरी सेवा पूर्वपरीक्षेसारखीच असल्याचे दिसून येते. यापूर्वी एमपीएससीने राज्यसेवा पूर्वपरीक्षेच्या अभ्यासक्रम व स्वरुपात १९९४ साली बदल केला होता.

२०११ साली एमपीएससीने सर्वप्रथम राज्यसेवा मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम बदलला. तत्पूर्वी पीएसआय, एसटीआय, असिस्टंट या परीक्षांच्या मुख्य परीक्षांचा तसेच सरळसेवा भरती परीक्षेचा अभ्यासक्रमही बदलण्यात आला होता.

एमपीएससीच्या स्पर्धा परीक्षांच्या स्वरूपातील व अभ्यासक्रमातील या बदलाला युपीएससीने नागरी सेवा पूर्व आणि मुख्य परीक्षांच्या अभ्यासक्रमात व स्वरूपात जो बदल केला त्याची पार्श्वभूमी आहे. युपीएससीने– वाय. के. अलघ समिती, दुसरा प्रशासकीय आयोग, एस. के. सिन्हा समिती, प्रा. अरुण निगवेकर सदस्य असलेली समिती,यांनी ज्या विविध शिफारशी आयोगाकडे केलेल्या आहेत त्यांचा आधार घेऊन – स्पर्धा परीक्षा पद्धतीत जो बदल केलेला आहे, तो संपूर्ण राज्यस्तरावर सर्वप्रथम अंमलात आणण्याची सुरुवात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने केलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्यसेवा पूर्वपरीक्षेचा २०१३ पासूनच्या परीक्षांचा अभ्यासक्रम बदलण्यात आलेला आहे.

सप्टेंबर २०१२ मध्ये सुधारीत स्वरूपातील पहिलीच राज्यसेवा मुख्य परीक्षा पार पडली. त्या परीक्षेला महाराष्ट्रातील तरुणांनी दिलेला प्रतिसाद हा निश्चितच उत्साहवर्धक होता. त्यानुसारच २०१३ च्या पूर्व परीक्षेचे जे स्वरूप बदललेले आहेत त्याचे मराठी तरुण स्वागतच करतील. तसे पाहता, राज्यसेवा पूर्व परीक्षेचा सुधारित अभ्यासक्रम हा युपीएससीच्या नागरी सेवा पूर्व परीक्षेच्या अभ्यासाशी १०० टक्के मिळताजुळता आहे.

युपीएससीने ही सुधारित सीसॅट परीक्षा सर्वप्रथम २०११ मध्ये घेतली होती, दुसरी परीक्षा २०१२ मध्ये झाली. या दोन्ही परीक्षांमध्ये आलेल्या प्रश्नांचे स्वरूप लक्षात घेऊन एमपीएससीच्या पूर्व परीक्षेत काय विचारले जाऊ शकेल याचा अंदाज येऊ शकतो.

एमपीएससी आणि युपीएससी पूर्व परीक्षेतला फरक २०१३ पासून पूर्णपणे नाहीसा झाल्याने त्याचा महाराष्ट्रातील तरुणांना युपीएससीत परीक्षेची तयारी करण्यासाठी निश्चितच फायदा होणार आहे. एमपीएससीचा हा निर्णय मराठी तरुणांना युपीएससीच्या परीक्षा देण्यासाठी फायदेशीर ठरणारा आहे.

पेपर १ (२०० गुण) : एकूण – ७ घटक
पेपर २ (२०० गुण) : एकूण – ७ घटक

### सामान्य अध्ययन पेपर १

या पेपरमधील घटक पुढीलप्रमाणे –

१) **चालू घडामोडी :**
राज्य (महाराष्ट्र), राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या चालू घडामोडी

२) **इतिहास –**
भारताचा इतिहास (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासहित) आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ

३) **महाराष्ट्र, भारत व जगाचा भूगोल –**
प्राकृतिक, सामाजिक, आर्थिक

४) **महाराष्ट्र व भारतीय राज्यपद्धती व प्रशासन–**
राज्यघटना, राजकीय व्यवस्था, पंचायती राज, नागरी प्रशासन, सार्वजनिक धोरण, मानवी हक्का संबंधीचे मुद्दे, इत्यादी.

५) **आर्थिक आणि सामाजिक विकास –**
शाश्वत विकास, दारिद्य, सर्वसमावेशक धोरण, लोकसंख्याशास्त्र, सामाजिक क्षेत्रातील पुढाकार, इत्यादी.

६) **पर्यावरणासंबंधी सर्वसाधारण मुद्दे –**
पारिस्थितिकी, जैविक बहुविविधता व वातावरणातील बदल – सदर विषयातील स्पेशलायझेशन दर्जाचे ज्ञान आवश्यक नाही.

७) **सामान्य विज्ञान –**

**राज्यसेवा पूर्वपरीक्षा २०१३**

| पेपर क्र. | गुण | वेळ | दर्जा | माध्यम | पेपरचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| पेपर १ (अनिवार्य) | २०० | २ तास | पदवी | मराठी व इंग्रजी | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| पेपर २ (अनिवार्य) | २०० | २ तास | टॉपिक १ ते ५ – पदवी स्तर<br>टॉपिक ६– इ. १०वी चा स्तर<br>टॉपिक ७– इ. १०वी /१२चा स्तर | मराठी व इंग्रजी | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**सामान्य अध्ययन पेपर २**

या पेपरमधील घटक पुढीलप्रमाणे –

१) आकलन
२) संवादकौशल्यासहित अंतरव्यक्तिगत कौशल्य
३) तर्कसंगत विश्लेषण व विश्लेषणात्मक क्षमता
४) निर्णय क्षमता आणि समस्येचे निराकरण
५) साधारण बुद्धिमापन चाचणी
६) मूलभूत अंकज्ञान (संख्या आणि त्यातील संबंध, ऑर्डर ऑफ मॅग्निट्यूड, इ.) (इयत्ता १० वी स्तर) – माहिती विश्लेषण (तक्ते, ग्राफ, टेबल आणि माहितीचा पुरेपणा, इ.– इयत्ता १० वी चा स्तर)
७) मराठी आणि इंग्रजी भाषा आकलन कौशल्य (१० वी /१२ वी चा स्तर)

**सूचना १** : पेपर २ मधील मराठी आणि इंग्रजी भाषेतील आकलनकौशल्य तपासण्याबाबतचे दहावी/बारावी स्तरावरचे उताऱ्यावरील प्रश्न (पेपर २ च्या अभ्यासक्रमातील सातवा घटक) हे फक्त मराठी व इंग्रजी लिपीतीलच असतील व त्यांचे परस्परांतील भाषांतर प्रश्नपुस्तिकेत दिले जाणार नाही.

**सूचना २** : सर्व प्रश्न हे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाचे असतील.

**सूचना ३** : उमेदवाराला राज्यसेवा पूर्वपरीक्षा पात्र ठरण्यासाठी, मूल्यमापनाच्या प्रक्रियेसाठी, दोन्ही पेपर देणे अनिवार्य आहे. जर एखाद्या उमेदवाराने दोन्हीपैकी एकच पेपर दिला तर तो/ती अपात्र ठरेल.

## State Services (Pre.) Examination 2013 Syllabus

**Paper I - (200 marks)**

1) Current events of state, national and international importance.
2) History of India (with special reference to Maharashtra) and Indian National Movement.
3) Maharashtra, India and World Geography - Physical, Social, Economic Geography of Maharashtra, India and the World.
4) Maharashtra and India - Polity and Governance - Constitution, Political System, Panchayati Raj, Urban Governance, Public Policy, Rights issues, etc.
5) Economic and Social Development - Sustainable Development, Poverty, Inclusion, Demographics, Social Sector initiatives, etc.
6) General issues on Environmental Ecology, Bio-diversity and Climate Change-that do not require subject specialisation.
7) General Science.

**Paper II - (200 marks)**

1) Comprehension
2) Interpersonal skills including communication skills.
3) Logical reasoning and analytical ability.
4) Decision - making and problem - solving.
5) General mental ability.
6) Basic numeracy (numbers and their relations, orders of magnitude, etc.) **(Class X level)**, Data interpretation(Charts, graphs, tables, data sufficiency etc**.- Class X level**)
7) Marathi and English Language Comprehension skills **(Class X/XII level).**

**Note 1 :** Questions relating to Marathi and English Language Comprehension skill of Class X/XII level (last item in the Syllabus of Paper II) will be tested through passages from Marathi and English language without providing cross translation thereof in the question paper.

**Note 2 :** The questions will be of multiple choice, objective type.

**Note 3 :** It is mandatory for the candidate to appear in both the Papers of State Services (Prelim) Examination for the purpose of evaluation. Therefore a candidate will be disqualified in case he / she does not appear in both the papers of State Services (Prelim) Examination.

***-Friday , 28 September 2012***

**State Services (Preliminary) Examination**

| *Paper No.* | *Marks* | *Duration* | *Standard* | *Medium* | *Nature of Paper* |
|---|---|---|---|---|---|
| Paper I (compulsory) | 200 | Two hours | Degree | M arathi English | objective |
| Paper II Type (compulsory) | 200 | Two hours | Topic No.(1) to (5) Degree Topic No.(6) class X level | Marathi English | objective |